# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.05.2025** **वार- शनिवार**

---

**हवामान**

पुणे जिल्ह्यासाठी आज हवामानाचा *ऑरेंज* इशारा दिलेला असून काही ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा सचेत ऍपद्वारे मंत्रालयातून देण्यात आला आहे.

**पाऊस**

पुणे शहरात अतिरिक्त पाऊस होईल, त्यादिवशी कोथरुडसह शहरात कुठेही पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्या असे निर्देश आमदार चंद्रकांत पाटील यांनी दिले.  कोथरूड मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी १०० स्वयंसेवक नेमण्याची सूचना त्यांनी केली.

**पाऊस**

महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थितीला सामोरं जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी आणि आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा, असे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज दिले. शहरातील जवळपास 90टक्के होर्डिंग काढण्यात आली असल्याची माहिती पालिका प्रशासनानं दिली आहे.

**वीजउपकेंद्र**

जुन्नर तालुक्यातील बोरी बुद्रुक इथं नवीन कृषी धोरणाअंतर्गत वीज उपकेंद्राचं भूमिपूजन आणि शेतजमीन मोजणी प्रकल्पातील 'क' पत्रक वाटप आज उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. नवीन उपकेंद्रामुळं औरंगपूर, निमगाव सावा आणि शिरोली सुलतानपूर भागाचा विद्युत पुरवठा सुरळीत होण्यासह नियमित दाबानं वीज उपलब्ध होणार आहे.

**नारायणगाव**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नारायणगाव पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचं लोकार्पणही आज करण्यात आलं.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या अंतर्गत या नवीन इमारतीमध्ये अभ्यागत, भव्य बैठक, हिरकणी, विश्रांती, ग्रंथालय, कवायत मैदान, धावपट्टी, व्हॉलीबॉल मैदान, जनसेवा केंद्र आणि महिला मदत केंद्राची निर्मिती केली असून महिला आणि वृद्धांच्या मदतीकरिता निर्भया पथक, भरोसा सेल, महिला दक्ष संमती, जेष्ठ नागरीक मदत केंद्र आदी कार्यरत आहेत.

**अटल**

पुणे महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाला राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानं त्रुटींची पूर्तता न केल्यास मान्यता रद्द का करू नये? अशी कारणं दाखवा नोटीस बजावली आहे. गेल्या चार वर्षात या महाविघालयामध्ये पुरेसे प्राध्यापक नाहीत. फॉरेन्सिक विभाग नाही. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह नाही याकडे आयोगानं लक्ष वेधलं आहे.

**कोरोना**

राज्यातील कोरोना रुग्णसंख्येत वाढ सुरू असून, गेल्या २४ तासांत आणखी ४५ रुग्ण आढळले आहेत. राज्यात सर्वाधिक ३५ रुग्ण मुंबईत असून, पुण्यातही ४ जणांना संसर्ग झालेला आहे. या महिन्यात कोरोनाचे एकंदर १७७ रुग्ण आढळले आहेत.

राज्यात १ जानेवारी ते २३ मेपर्यंत कोरोनाच्या ६ हजार ८१९ संशयित रुग्णांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यात २१० रुग्णांना कोरोनाचं निदान झालं. शासकीय रुग्णालयांत कोरोना तपासणी आणि उपचारांची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळं नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असं आरोग्य सहसंचालिका डॉक्टर बबिता कमलापूरकर यांनी सांगितलं.

**उपजीविका**

पिंपरी चिंचवड शहरातील उपजीविकेच्या संधी अधिक बळकट व्हाव्यात या उद्देशानं महापालिकेनं शहर उपजीविका कृती आराखडाअंतर्गत दोन दिवसांच्या विशेष गटचर्चेचं आयोजन केलं होतं. यामध्ये उद्योग, शासकीय विभाग, पतसंस्था, सामाजिक संघटना आणि नागरी समाजातील १८० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. नव्या पिढीची बदलती मानसिकता, कामाच्या अपेक्षा आणि रोजगारातील अडचणी यावर सखोल चर्चा यावेळी झाली. उद्योग-व्यवसाय, पायाभूत सुविधा आणि बांधकाम आणि वित्त या प्रमुख क्षेत्रांमधील योजनांची अपुरी माहिती, आर्थिक सहाय्याचा अभाव आणि कौशल्य प्रशिक्षणातील गरजा या प्रमुख आव्हानांवर यावेळी चर्चा करण्यात आली. या विशेष गटचर्चेच्या माध्यमातून मिळालेल्या सूचनांच्या आधारे आराखड्याचं प्रारूप तयार केलं जाणार असून, लवकरच ते नागरिकांच्या अभिप्रायासाठी सादर करण्यात येणार आहे.

**वाडे**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेतर्फे शहरातील 13 धोकादायक वाड्यांचा भाग उतरवण्यात आला आहे. महापालिकेनं केलेल्या सर्वेक्षणात १०२ वाडे अतिधोकादायक स्थितीत आहेत. त्यांचा भाग ७ जूनपर्यंत उतरविला जाणार आहे.

**<u>शोकसभा</u>**

ज्येष्ठ खगोलशास्त्र प्राध्यापक डॉक्टर जयंत विष्णु नारळीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एका शोकसभेचं आज आयोजन करण्यात आलं होतं. कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र - कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर आदी मान्यवरांनी डॉक्टर नारळीकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत त्यांना आदरांजली वाहिली. त्यांनी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात अनेक वर्षे अध्यापनाचं कार्य केलं असं डॉक्टर पराग काळकर यांनी यावेळी सांगितलं. याप्रसंगी पुण्यातील शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवर तसंच विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**